**महात्मा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय,पारशिवनी.जि.नागपूर**
**विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबीर**
**कालावधी दि 10.02.2020 ते 16.02.2020**
**स्थळ –दत्तक ग्राम पालोरा ता.पारशिवनी**

युवा म्हटले की स्वामी विवेकानंद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज या महानविभुतींची प्रतिमा आपल्या डोळयासमोर येते. त्यांनी युवकांच्या आरोग्यासाठी, खेडयातील ग्राम स्वच्छतेसाठी केलेले महान कार्य आपल्या डोळयासमोर एखाद्या चलचित्रा प्रमाणे दिसू लागले. तेव्हा आपले मन पाण्याचे वृक्षांवर सिंचन केल्या नंतर जसे ताजे तवाने आणि प्रफूल्लीत दिसते, तसे मन प्रफुल्लीत होऊन जाते. त्यामुळे युवा शक्ती जागृत होत असते.

आमच्या महाविद्यालयात 1993 मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची सुरूवात झाली. 50 विद्यार्थ्यांपासून सुरू झालेले हे पथक आज 300 विद्यार्थ्यांचे आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांची 15 जून ते 31 जुलै या कालावधीत नोंदणी करण्यात येते. नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात येवून राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती दिली जाते. योजनेचे उदघाटन झाल्यानंतर प्रत्यक्ष कार्याला सुरूवात होते. या योजनेत त्रिस्तिरीय कार्यक्रम राबविण्यात येते. यात विद्यार्थ्यांना 120 तास काम करणे आवष्यक आहे.

सत्र 2019–20 मध्ये महाविद्यालयात विद्यार्थ्यांना एकुण 06 वेळा श्रमदान करून परिसराची स्वच्छता केली तसेच ग्राम पालोरा येथे श्रमदान व वृक्षारोपण केले. स्वच्छते विषयी पथनाटयाव्दारे जाणीव जागृती केली.
बौध्दीक कार्यक्रमांतर्गत शिक्षक दिन एडस सप्ताह,तंबाखु अभियान,महात्मा गांधी जयंती, महात्मा ज्योतिबा फुले जयंती, सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकांनद जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

24/09/9ला राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा.जगदिश गुजरकर (आदर्श महाविद्यालय,रामटेक) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थायी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनायक इरपाते होते. राष्ट्रीय सेवा योजना दिना निमित्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. लता मंगेशकर हॉस्पिटल डिगडोह नागपूर येथील रक्त पेढीने रक्त संकलनाचे कार्य केले. यावेळी एकूण 26 रक्त दात्यांनी रक्तदान केले.

अंगदेव पात्रे यांनी पोरवाल महाविद्यालय,कामठी,व कृंष्णा पलांदुरकर यांनी तायवाडे महाविद्यालय, डी.एन.सी. महाविद्यालय आणि बॅ. शेषराव महाविद्यालय या महाविद्यालयाद्वारे आयोजित राज्यस्तरीय शिबीरात भाग घेतला.

व्यक्तिमत्वविकास उत्तम चारित्र्य व सुप्तगुणांचा विकास होण्याच्या दृष्टीने व समाजाभिमुख आदर्श नागरिक घडविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करीत असते राष्ट्रीय सेवा योजनेच्या ब्रिद वाक्यानुसार **"Not Me But You"** विद्यार्थ्यांमध्ये संस्कार करण्याचे काम काळाच्या ओघानुसार राष्ट्रीय सेवा योजना करीत असते त्यानुसार स्वच्छ भारत अभियान या उपक्रमांतर्गत ग्राम पालोरा येथे 7 दिवसीय विद्यापीठस्तरीय विषेश श्रम संस्कार शिबीर दिनांक 10 ते 16 फेब्रुवारी 2020 या दरम्यान आयोजित करण्यात आले होते. दिनांक 10 फेबुवारी 2020 ला स्वयंसेवकाचे आगमन झाले. त्यानंतर परिसर स्वच्छता व शिबीर उभारणी करण्यात आली. दिनांक 11 फेबंवारी 2020 ला दुपारी 11.30 वाजता मा.सो.रश्मी बरवे (अध्यक्ष जि'प.नागपूर) यानी शिबीराचे उदघाटन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा. युंवराज चालखोर (कार्यवाह, व्हीएसपीएम अॅकडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर ) तर

प्रमुख अतिथी म्हणून , तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनायक इरपाते तर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य गंगाधर काकडे, पुरूषोत्तम धोटे, ज्ञानेश्वर बडवाईक, ग्रामपंचायत पालोराचे सरपंच प्रकाश कामडे उपस्थित होते. या प्रसंगी .सो.रश्मी बरवे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांमध्ये धाडस निर्माण होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. ग्रामपालोरा येथे दररोज सकाळी 8.30 वा. ते 11. 30 वा. पर्यंत श्रमदान करण्यात आले. दुपारी 3.00 वाजता व्याख्याना च्या कार्यक्रमाला सुरूवात झाली. यात राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर डॉ. सांवत धर्मपुरीवार, राष्ट्रीय सेवा योजना व युवक या विषयावर खुषाल कापसे स्वयंसिध्दा या विषयावर नंदू कपूर कायदा विषयक मार्गदर्शन अमिषा अरोरा यानी मार्गदर्शन केले. सायंकाळी 7.00 वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरूवात झाली. यात विद्यार्थ्यांनी पथनाटय, एकांकीका, नृत्य, गीत, नकला या माध्यमातून अंधश्रध्दा निर्मूलन, दारूबंदी, व्यसनमुक्ती, हुंडाबळी इ. विषयावर प्रबोधन करण्यात आले. दि. 15 फेब्रुवारी 2020 ला सकाळी 11.00 वा. शिबिराचा समारोप मा. डॉ. विनायक इरपाते यांचे अध्यक्ष खाली व पारशिवनीचे तहसीलदार वरूाण्कुमार सहारे,खंडविकास अधिकारी प्रदिप ब्रमनोटे,मुख्याधिकारी सो.अर्चना वंजारी यांचा प्रमुख उपस्थितित संपन्न झाला.

या शिबीरात डी.एन.सी. महाविद्यालय नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय नागपूर, सेवादल महिला महाविद्यालय नागपूर, भवभूती महाविद्यालय आमगांव, एन.एम.डी. महाविद्यालय गोंदिया, कला व विज्ञान महाविद्यालय पुलगांव, तायवाडे महाविद्यालय कोराडी, कोल्हटकर महाविद्यालय रोहना, जंगदबा महाविद्यालय कोराडी येथील विद्यार्थ्यांनी भाग घेतला कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ. काशीनाथ मानमोडे यांनी प्रास्ताविक डॉ. राकेश कभे यांनी केले आभार डॉ. सुधिर काहाते यांनी केले. दिनांक 16/02/2020 ला शिबीराचे प्रस्थान झाले.

PRINCIPAL
Mahatma Gandhi Arts
& Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

M. G. Arts & Commerce College
Dist. Nagpur
Parseoni

कार्यक्रम अधिकारी
प्रा.डॉ.राकेश कभे

विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबीर
कालावधी दि 10.02.2020 ते 16.02.2020
स्थळ –दत्तक ग्राम पालोरा ता.पारशिवनी


























**PRINCIPAL**
**M. G. Arts & Commerce College**
Parseoni, Dist. Nagpur

M. G. Arts & Commerce College
Dist. Nagpur
Parseoni

IQAC CO-ORDINATOR
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग

"आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना
सन २०१९-२०"

# प्रमाणपत्र

सन २०१९-२० या वर्षात 'आर.आर.(आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार' योजनेंतर्गत तालुका स्तरावर
घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये निर्धारित निकषामध्ये नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातून सर्वाधिक गुण प्राप्त केले असल्याने

पालोरा

या गावास "तालुका सुंदर गाव" म्हणून गौरविण्यात येत आहे.

(श्री योगेश कुंभेजकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

(सौ रश्मी श्यामकुमार बर्वे)
अध्यक्षा
जिल्हा परिषद नागपूर

(डॉ.नितीन राऊत)
पालकमंत्री
नागपूर जिल्हा

स्थळ : नागपूर

दिनांक - १६ फेब्रुवारी २०२१

PRINCIPAL
M. G. Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur

M. G. Arts & Commerce College
Dist. Nagpur
Parseoni

IQAC CO-ORDINATOR
Mahatma Gandhi Arts & Commerce College
Parseoni, Dist. Nagpur